*Quest Journals*
*Journal of Research in Humanities and Social Science*
*Volume 10 ~ Issue 8 (2022) pp: 195-198*
*ISSN(Online):2321-9467*
www.questjournals.org

**Research Paper**

# कायदा-समाजपरिवर्तनाचेएकमाध्यम

या १५ ऑगस्ट ला भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे होतील.या वर्षी आपण स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत.भारतीय लोकशाही दिवसेंदिवस प्रगल्भ होत आहे याचे श्रेय केवळ अन केवळ भारतीय संविधानाला जाते.विविध प्रकारची विषमता (धर्म, वंश, वर्ण,जाती,भाषा आणि वर्ग) असलेल्या,भोगोलिक दृष्ट्या आकाराने विशाल असलेल्या या देशाला एकत्र बांधून ठेवण्याचे श्रेय भारतीय संविधानाला जाते.या प्रसंगी कायद्याचे राज्य ह्या संकल्पनेचा आणि सामाजिक परिवर्तनासाठी कायदा कश्या पद्धतीने उपयोगी पडतो याचा थोडक्यात उहापोह करण्याचा हाप्रयत्न.

***R**eceived 07 August, 2022; **R**evised 20 August, 2022; **A**ccepted 22 August, 2022 © The author(s) 2022.*
***P**ublished with open access at **www.questjournals.org***

**कायद्याचे राज्य संकल्पना :-**

न्याय–पंडितांच्या मते राज्य ही वैधानिक संस्था आहे.राज्य कायद्याची निर्मिती करून त्याची अमलबजावणी करते.कायद्यामागे राज्याची शक्ती असते.त्याचे पालन करणे हे सर्वांचे कर्तव्य असते . त्यामुळे राज्याला कायदे निर्माण करणारी सर्वश्रेष्ट संस्था म्हटले जाते.

सामाजिक परिवर्तनाची / बदलाची संकल्पना ;-

सामाजिक बदलाची संकल्पना स्पष्ट करतांना समाज शास्त्रज्ञ असे म्हणतात की , “मानवी परस्पर संवादातील बदल आणि सांस्कृतिक व सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणणारे नाते म्हणजे सामाजिक परिवर्तन होय”.हे बदल कालांतराने घडतात आणि समाजासाठी दीर्घकालीन परिणाम घडवून आणतात.दीर्घकालीन प्रभाव असलेल्या महत्वपूर्ण सामाजिक बदलांचे उदाहरण म्हणजे जगप्रसिद्ध औद्योगिक क्रांती,गुलामगिरीचे उच्चाटन आणि स्त्रिवादी चळवळी याचबरोबर इंग्लंड,अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांती होय.

**न्याय शारुत्रातील सामाजिक बदल ;-**

मुल्ये किंवा वैशिष्ट्ये सामायिक करणाऱ्या लोकांच्या समूहावर परिणाम करणारी कोणतीही कृती,सामाजिक बदल म्हणता येईल.सामन्यात: सामाजिक जीवनाच्या विद्यमान पद्धतीतील बदलाला सामाजिक बदल म्हणता येते.

**सामाजिक बदल आणि कायदा यातील सहसंबंध :-**

हा संबंध स्पष्ट करण्यासाठी आपणास कायद्याची उद्दिष्टे काय आहेत ते पाहावे लागेल .

**सामान्यत: कायद्याची दोन उद्दिष्टे असतात–**

१) पहिले उद्दिष्टय म्हणजे, समाजात स्थेर्य राखणे आणि व्यवस्थित जीवन जगणे.
२) दुसरे उद्दिष्ट्य म्हणजे बदलत्या,बदलत्या समाजाच्या गरजेनुसार स्वत:मध्ये बदल करून सामाजिक बदल घडवून आणणे होय.

अमेरिकन न्यायाधीश बेन्जामिन कुर्दोझा ह्यांनी असे म्हटले होते की,"कायद्याकडे सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करणारे एक निश्चित साधन म्हणून न पाहता समाजाच्या कल्याणासाठी आवश्यक असलेले एक लवचिक साधन म्हणून त्याकडे पहिले जावे आणि हेच भारतीय संविधानाचे सार आहे".

कायदा हा समाजाच्या आशा –आकांक्षांचे प्रतिबिंब असतो.असे म्हटले जाते की तुम्हाला कोणत्याही समाजाचा अभ्यास करावयाचा असेल तर तुम्हाला त्या समाजाने लागू केलेल्या कायद्यांचा अभ्यास करावा लागेल.त्यावरून कळेल की तो समाज विकसित आहे की जंगली जग.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतीय समाजात अनेक वाईट चालीरीती, प्रथा, परंपरा अस्तित्वात होत्या, ज्या मानवाला मानवी अधिकारापासून वंचित करीत होत्या.धार्मिक पगडा समाज मनावर इतका खोलवर रुजला होता की त्याला विरोध करणे अत्यंत जिकरीचे काम होते.वर्ण-व्यवस्थेने लागू केलेली उतरंड आणि स्त्री –पुरुष भेद समाज मनामधून समूळ नष्ट करणे आजतागायत अत्यंत जिकरीचे असलेले दिसून येते. ब्रिटीश काळात समाज सुधारकांनी अनेक प्रयत्न करून व ब्रिटिशांनी त्या काळी केलेल्या अनेक समाजसुधारक कायद्यांमुळे भारतीय समाजात समांज परिवर्तनाचे वारे वाहू लागले.त्यामुळे समाजात अनेक सकारात्मक बदल घडून आले. यासाठी राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, लो.टिळक, न्या. रानडे, आगरकर, गोखले, महर्षी कर्वे,शाहू महाराज आणि संविधान निर्माते बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक प्रयत्नांनी समाजातील वाईट चालीरीती, प्रथा परंपरा मोडीत काढता आल्या. याचीकाहीउदाहरणेपुढिलप्रमाणेसांगतायेतात :-

१) गुलामगिरी आणि वेठबिगारी पद्धत (भारतीय संविधान कलम २३),
२) सतीप्रथा (१९८७),
३) विधवापुनर्विवाह (१८५६),
४) बालविवाह पद्धती (The Sarda Act 1929,2006),
५) बालमजुरी /बालकामगारपध्दती(भारतीय संविधान कलम २४),
६) शिक्षणाचाअधिकार (अस्पृश्यवस्त्रियांसाठी),
७) अस्पृश्यतानिवारण(भारतीय संविधान कलम १७).

कोणत्याही राज्याचा विकास हा तेथील जनतेच्या विकासावरच अवलंबून असल्यामुळे प्रत्येक राज्य आपल्या नागरिकांना अधिकार देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या संपूर्ण विकासासाठी प्रयत्नशील असते. भारतालास्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० पासून भारताचा स्वतः चा स्वतंत्र कायदा लागू झाला व कायद्याचे अधिराज्य प्रस्थापित झाले.या कायद्यालाच संविधान असे म्हणतात.भारतीय संविधानाने भारतीय समाजातील सर्व वाईट चालीरीती,प्रथा परंपरांचे कायद्याद्वारे उच्चाटन करून प्रत्येक भारतीय नागरिकाला समान संधी, स्वातंत्र्य व न्याय या तत्व त्रयींची अविस्मरणीय भेट दिली. त्याचबरोबर काही मुलभूत अधिकारही प्रदान केले आहेत. प्रा.पायली म्हणतात त्याप्रमाणे, 'मुलभूत अधिकाराद्वारे व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि राज्याची शक्ती ह्यावर मर्यादा घातल्या जातात.' त्याद्वारे प्रत्येक नागरिकाचे अधिकार अबाधित राहतात व प्रत्येक नागरिकाला आपल्या अधिकार व कर्तव्यांची जाणीव होते .

भारतीय संविधानातील तिसऱ्या भागात कलम १२ ते ३५ मध्ये पुढील सहा मुलभूत अधिकारांचा उल्लेख करण्यात आला आहे .

१) समतेचा अधिकार ( कलम १४ ते १८ )

२)स्वातंत्र्याचा अधिकार ( कलम १९ ते २२ )

३) शोषनाविरुद्धचा अधिकार ( कलम २३ ते २४ )

४) धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार ( कलम २५ ते २८ )

५) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार ( कलम २९ ते ३० )

६) घटनात्मक उपायांचा अधिकार ( कलम ३२ ते ३५ )

ह्या अधिकारांद्वारे भारतीय समाजात पूर्वीपासून चालत आलेल्या जाती,धर्म,पंथ,वर्ण,लिंग,जन्म ह्या सर्व प्रकारच्या विषमतांवर प्रहर करण्याचे कार्य भारतीय संविधानकारांनी केले.अशा पद्धतीने भारतीय समाजात व मानसिकतेत परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य संविधानाद्वारे करण्यात आले.म्हणूनच असे म्हणता येते की आजच्या जगात नागरी समाजात राहणाऱ्या व्यक्तीचे वैयक्तिक व सामाजिक आयुष्य वेगवेगळया कायद्यांनी पूर्णत : वेढलेले आहे.

वैयक्तिक कायदे,आर्थिक कायदे,सामाजिक कायदे,गुन्हेगारी कायदे,आणि मुलभूत अधिकाराविषयीचे कायदे संपूर्ण समाजाचे वैयक्तिक आयुष्य नियंत्रित करतात.एकीकडे समाज कायदा घडवितो तर दुसरीकडे कायद्यातून समाज,समाजाची मानसिकता घडते असे म्हणता येईल.

कायद्यातून समाजाची मानसिकता घडते याची अनेक उदाहरणे भारतीय समाजात अस्तित्वात आहेत. भारतीय समाजात असलेल्या सर्व विषमता व भेदांचे समूळ उच्चाटन तर भारतीय संविधानातील अनेक कलमांद्वारे व संसदेने आजपर्यंत केलेल्या अनेक कायद्यांद्वारे करण्यात आले, पण समाजातील मानसिकता बदलण्यासाठी भरपूर कालावधी जावा लागला.आजही आपल्या आजूबाजूला अनेक अशा घटना घडतात ज्या दाखवून देतात की समाजमन काही प्रमाणात बदलले असले तरीही पूर्णपणे बदललेले नाही.आजही समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारा च्या प्रमाणात घट झालेली दिसून येत नाही. विशिष्ट धार्मिक स्थळी स्त्रियांना दर्शन नाकारणे,अल्पवयीन मुलींवरील बलात्कार,दलित स्त्रियांवरील अत्याचार,सामाजिक प्रतीश्ठेसाठी नाकारण्यात येणारे अंतर जातीय विवाह व त्यातून घडून येणारे अत्याचार व हत्या,घरगुती हिंसाचार,स्त्रीभ्रूण हत्या,तिहेरी तलाक,लव जिहाद सारख्या धार्मिक संकल्पना व त्यातून घडणारे अत्याचार यासारख्या उदाहरणांमधून समाजाचा महिलांप्रती असलेला दुय्यमत्वाचा व तीच्याकडे केवळ उपभोग्य वस्तू म्हणून बघण्याचा पुरुषी दृष्टीकोन तसाच असलेला दिसून येतो.महिलांवर होणाऱ्या निरनिराळया अत्याचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करून देण्यासाठी भारतात अनेक कायदे अस्तित्वात आहेत.त्यामध्ये,

१) भारतीय दंड विधान कायदा -१८६०,
२) हुंडाप्रतिबंधककायदा -१९६१,
३) घटस्फोटकायदा -१८६९ ,
४) कौटुंबिकन्यायालयकायदा -१९८४
५) मुस्लीम महिलांसाठी कायदा – (१९८६),
६) गर्भलिंगपरीक्षणवगर्भपातकायदा– १९९४,
७) कौटुंबिकहिंसाचारापासूनसंरक्षणकायदा -२००५
८) कामाच्याठिकाणी लैंगिक छळ व त्यापासून महिलांचे संरक्षण कायदा -२०१३,
९) निर्भयाकायदा -२०१३
१०) तिहेरीतलाककायदा -२०१९

वर उल्लेखित कायद्यांमुळे समाजात स्त्रियांचे प्रश्न वत्या प्रश्नांची तीव्रता कमी झाली असली तरीही पूर्णपणे त्यांचे उच्चाटन झालेले नाही.यासाठी धार्मिक दृष्ट्या स्त्रियांचे झालेले दैवतीकरण कमी करून त्यांचा केवळ एक मनुष्यप्राणी म्हणून स्विकार करण्याची गरज प्रकर्षाने जाणवते.

अस्पृश्य वर्ग,महिला वर्ग या बरोबरच लिंग भेद या प्रकारात मोडणारा एक वर्ग म्हणजे तृतीयपंथी वर्ग होय. या वर्गातील लोकाचे अनेक प्रश्न होते.त्याबाबत २०१४ मध्ये भारतीय सर्वोच्च न्यायालयाने तृतीय-पंथीयांना तिसरी वेगळी ओळख म्हणून भारतीयांना त्यांचे(gender) लिंग निवडण्याचा अधिकार असल्याचा निर्णय दिला.या निर्णयामुळे त्यांना निवडणुकीत उभे राहण्याचा हक्क प्राप्त झाला आहे.हा खरोखराच खूप मोठा सामाजिक बदल आहे.तसेच ह्या वर्गासाठी ( LGBT) २०१९ मध्ये अधिकारांचे संरक्षण कायदा संसदेने संमत केला.

भारतीय संविधानाने भारतीय न्यायव्यवस्था कायदेमंडळ व कार्यकारी मंडळापासून स्वतंत्र ठेवल्यामुळे न्यायव्यवस्था राज्यकर्त्यांच्या दडपणाखाली न येता कार्य करू शकते हे सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांमधून व न्यायाधीशांनी वेळोवेळी दिलेल्या मतांमधून स्पष्ट होते.यासंदर्भात न्यायमूर्ती पी.एन.भगवती ह्यांनी मांडलेले आपले मत अत्यत महत्वपूर्ण ठरते.ते

म्हणतात की, "समाजाच्या गरजा पूर्ण करू शकेल असा जिवंत घटक निर्माण करण्यासाठी,कायद्याच्या संरचनेत जीवन प्रदान करणे आणि रक्त ओतणे ही जबाबदारी न्यायाधीशांवर आहे." याचे अलीकडील काळातील काही उदाहरणे देता येतील, २०१९मधील राफेल प्रकरणाबाबत मत नोंदवतांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश Adv.रंजन गोगोई म्हणाले की,"गोपनीय कागदपत्रे मिळवणे हे सार्वजनिक हिताचे असेल आणि हे सार्वजनिक हित कागद गोपनीय राखण्याच्या हितापेक्षा मोठे असेल तर अशी कागदपत्रे उघड करणे व त्या आधारे शासनाला प्रश्न करणे हा गुन्हा होऊ शकत नाही".याद्वारे कायद्याचा आधार घेऊन नागरिकांना प्रश्न विचारन्यापासून वंचित ठेवण्याच्या सर्वच शासनाच्या प्रयत्नांना वेसन घातली आहे.

२०१९ मधील दुसरा निकालही स्वातंत्र्याला बळकटी देणारा आहे. झुंडशाही स्वातंत्र्य हिरावून घेते तेव्हा काय करायचे ? एखादे नाटक,चित्रपट,पुस्तक किंवा संस्था राजकीय पक्षांच्या झुंड शाहीची बळी पडते तेव्हा त्यास अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचे उल्लंघन म्हणतात.यावेळी प.बंगाल सरकारने बंगाली चित्रपट "भोभिश्योतेर भूत"वर बंदी घातली.या प्रकरणावर सुनावणी करतांना सर्वोच्च न्यायालाचे न्यायाधीश डी.वाय.चंद्रचूड आणि हेमंत गुप्ता यांनी जमाव हिंसा करेल या भीतीपोटी अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध घालता येणार नाही,असे स्पष्ट केले.

याचबरोबर राजद्रोहाचे कलम (भा दं वि १२४ - ए ) स्थगित करण्यात आले असून लवकरच त्यावर बंदी येऊ शकते.याचे कारण म्हणजे गेल्या काही वर्षात काही पत्रकार किंवा राजकीय मंडळी वा विद्यार्थी आंदोलक यांच्यावर त्यांनी केलेल्या सरकारवरील टीकेबद्दल काही सरकारांनी असहिष्णुता दाखवत राजद्रोहाचे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण वाढलेले आहे.हे कलम देशाच्या एकात्मता आणि अखंडतेसाठी आवश्यक असले तरी पोलीस यंत्रणा त्याचा गैरवापर करीत असल्याचे न्यायव्यवस्थेच्या निदर्शनास आल्यामुळे हे कलम स्थगित करण्यात आले.

**समारोप :-**

वर उल्लेखित हे काही महत्वपूर्ण कायदे आहेत ज्यामुळे खरोखरच सामाजिक परिवर्तन जे बदलत्या काळानुसार अपेक्षित होते,ते घडून येतांना दिसते.भारतीय लोकशाही ही सर्वसमावेशक लोकशाही म्हणून जगात प्रसिद्ध आहे.इथली विविधता,त्या विविधतेला टिकवून ठेवण्यासाठी निर्माण करण्यात आलेले कायदे व त्यांना अनुसरून भारतीय संविधानाने न्याय,स्वातंत्र्य,समता व बंधुता या तत्वांचा केलेला स्विकार भारतीय राजकारणासाठी मार्गदर्शक असणे अपेक्षित आहे.खरया अर्थाने सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी केवळ कायदे करून भागत नाही तर जनतेच्या लोकप्रतिनिधींचे प्रामाणिक प्रयत्न व"मी प्रथमत: व अंतिमत: भारतीय आहे" ही भावना प्रत्येक भारतीयाच्या मनी रुजवणे / असणे गरजेचे आहे.यावेळी २०१९ मध्ये सबरीमाला प्रकरणात न्यायमूर्ती नरीमन यांनी नोंदवलेल्या मताचा उच्चार करावासा वाटतो . त्यांच्या मते,"सर्वांसाठी पवित्र ग्रंथ हा भारतीय संविधानच आहे."

**संदर्भ :-**


१) भारतीयशासनआणि राजकारण ,बी .ए. ,द्वितीय वर्ष,सत्र -३ ( २०१३ )

२) रा .ज .लोटे ,पिम्प्लापुरे एन्ड क.पब्लीशर्स,महाल ,नागपूर -४४००३२

३) भारतीय शासन आणि राजकारण ,बी .ए.द्वितीय वर्ष ,सत्र ३ ( २०१७ )सरसाहित्यकेंद्र ,नागपूर -४४००३४

४) कौटुंबिकहिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा -२००५,माहिती पुस्तिका,महाराष्ट्रशासन,महिलावबालविकासआयुक्तालय, मुंबई.

५) सामाजिकसंकल्पना,बी.ए.प्रथम, (२०१५ ), डॉ. पी.डी. पाटील,अंशुल प्रकाशन ,नागपूर -४४००३२

६) राजकीयसिद्धांत,बी.ए.प्रथमवर्ष ,सत्रएक,( २०१६ ),सर साहित्य केंद्र,नागपूर -४४००३४

७) https : // aishwaryasandeep.com / 2021 /06/27/ law-as-an-instrument-of-social-change

८) http : // www.legalserviceindia.com/article/1171/Law-And-Social-Change.html

९) https://www.psychologydisscussion.net/social-psychology-2/social-change-meaning.types-and-characteristics /1146

१०) https://divyamarathi.bhaskar.com/news/MAG-law-and-society-jai-2160557.html

११) https://www.esakal.com/amp/sampadkiy/nisha-shivurkar-writes-law-and-social-change-pjp78

१२) https://blog.ipleaders.in/an-law-used-instrument-creating-soial-change/